## - प्रकरण सहावे -

## शेतमजुरांकडे असणा-या सुखासोईच्या वस्तू

६·० :

शेतमजुराकडे स्टोव्ह,गॅस,शिवणयंत्र,सायकल,कॉट गादी,रेडीओ, टेबल-खुर्ची, वाद्य,घड्याळ, व स्वयंचलीत वाहन इत्यादी व यासारख्या सुखसोईच्या वस्तू काही आहेत का ? याची माहिती या प्रकरणात दिलेली आहे ही माहिती शेतमजुरांचे उत्पन्न, शैक्षणिक पातळी, शेतजमीनीचे - आकारमान व कुटुंबाचे आकारमान या संदर्भात दिलेली आहे·

६·१ :

शेतमजुरांकडे असणा-या सुखासोईच्या वस्तूचे पृथ्थकरण आपणास शेतमजुरांच्या उत्पन्नानुसार पुढीलप्रमाणे करता येतील· त्यासाठी शेतमजुरांच्या उत्पन्नाचे १) ३,००० रूपये ते ४,५०० रूपयांपर्यंत २) ४,५०१ ते ६,००० रूपये व ३) ६,००१ ते ९,००१ रूपयांपेक्षा जास्त असे तीन गट केले आहेत·

६·१·१ :

अल्पभूधारक शेतमजुरांकडे असणा-या वस्तूंचे विवेचन त्यांच्यावरील उत्पन्न गटानुसार पुढीलप्रमाणे केले आहे·

१ अे : ३,००० रूपये ते ४,५०० रूपयांपर्यंत :

या उत्पन्न गटातील सतरा (१८·२७ टक्के) शेतमजुरांपैकी दहा - (५८·८२ टक्के) शेतमजुरांकडे यापैकी कोणतीही वस्तू नाही· या उत्पन्न गटातील तीन (१७·६५ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह आहे· तर तेवढ्याच -

शेतमजुरांकडे सायकली आहेत तसेच प्रत्येकी एका (५·८८ टक्के) शेतमजुराकडे कॉट व रेडिओ आहे चार (२३·५३ टक्के) शेतमजुरांकडे घड्याळ आहे·

१ बी : ४,५०१ ते ६,००० रुपये :

या उत्पन्न गटातील एकोणचाळीस (४१·९४ टक्के) शेतमजुरांमधील चौदा (३५·९० टक्के) शेतमजुरांकडे यातील कोणतीही वस्तू नाही· सोळा (४१·०६ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह आहेत· तेरा (३३·३३ टक्के) शेतमजुरांकडे सायकल, सात (१७·९५ टक्के) शेतमजुरांकडे कॉट, बारा(३०·७७ टक्के) - शेतमजुरांकडे रेडिओ आहे· तर प्रत्येकी एका (२·५६ टक्के) शेतमजुरांकडे टेबल-खुर्ची व वाद्य आहे· तसेच चौदा (३५·९० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत· एका (२·५६ टक्के) शेतमजुराकडे स्वयंचलीत वाहन आहे·

१ सी : ६,००१ ते ९,००१ रुपयांपेक्षा जास्त :

उत्पन्न असणा-या ३७(३९·७८ टक्के) शेतमजुरांमधील आठ - (२१·६२ टक्के) शेतमजुरांकडे सुखसोईच्या कोणत्याही वस्तू नाहीत· पंधरा (४०·५४ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह आहे· तर एका (२·७० टक्के) शेतमजुराकडे शिवणयंत्र आहे· तेरा (३५·१४ टक्के) शेतमजुराकडे सायकली आहेत· बारा (३२·४३ टक्के) शेतमजुरांकडे कॉट आहे· वीस (५४·०५ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ आहे· तर टेबलखुर्ची,वाद्य व घड्याळ असणा-या शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे दोन (५·४१ टक्के),एक (२·७० टक्के) व एकोनीस (५१·३५ टक्के) आहे·

६·१·२ :

भूहीन शेतमजुरांकडे असणा-या वस्तुंचे विवेचन त्यांच्या वरील उत्पन्न गटानुसार पुढीलप्रमाणे केले आहे·

२ अे :

३,५०१ ते ४,५०० रुपयांपर्यंत उत्पन्न गटातील पाच (२२·७३ टक्के) शेतमजुरांमधील तीन (६० टक्के) शेतमजुरांकडे यातील काहीही नाही· एका (२० टक्के) शेतमजुराकडे स्टोव्ह आहे· तर प्रत्येकी दोन (४० टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळ आहे·

२ बी :

४,५०१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटातील अकरा (५० टक्के) - शेतमजुरांपैकी चार (३६·३६ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही वस्तू नाहीत· तीन (२७·२७ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह आहे· प्रत्येकी एक (९·०९ टक्के) शेतमजुरांकडे शिवणयंत्र व सायकल आहे· तर प्रत्येकी पाच (४५·४५ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळे आहेत असे आढळून येते·

२ सी :

६,००१ ते ९,००० रुपयांपर्यंत उत्पन्न गटातील सहा (२७·२७ टक्के) शेतमजुरांपैकी दोन (३३·३३ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही वस्तू नाहीत· प्रत्येकी दोन (३३·३३ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह व घड्याळे आहेत तर प्रत्येकी एका (१६·६० टक्के) शेतमजुरांकडे सायकल, कॉट व घड्याळ आहे·

६·१·३:

खांडकरी शेतमजुरांकडे असणाऱ्या सुखसोयींच्या वस्तूंची माहिती त्यांच्या उत्पन्नाच्या आधारे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते·

··· १५७/-

३ अे :

५,००१ ते ६,००० रुपये उत्पन्न गटातील दोन (४० टक्के) शेतमजुरापैकी एका (५० टक्के) शेतमजुराकडे सायकल आहे. तर दोन्ही (१०० टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळे आहेत.

३ बी :

७,००१ ते ९,००० रुपये उत्पन्न गटातील तीन (६० टक्के) शेतमजुरामधील प्रत्येकी एका (३३.३३ टक्के) शेतमजुराकडे स्टोव्ह, कॉट व रेडिओ आहेत. दोन (६६.६७ टक्के) शेतमजुरांकडे सायकली आहेत. तर तिन्ही (१०० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत.

६.२.० :

शेतमजुरांकडे असणाऱ्या वस्तुंचे पृथःकरण करण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक पातळीचे १) अशिक्षित २) प्राथमिक ३) माध्यमिक व उच्च माध्यमिक असे तीन गट पाडून पुढीलप्रमाणे करता येईल.

६.२.१ :

अल्पभूधारक शेतमजुरांजवळील वस्तूंचे विवेचन त्यांच्यावरील शैक्षणिक गटाशी पुढीलप्रमाणे मांडता येईल.

२.१ अे : अशिक्षित :

अल्पभूधारक ३८ आहेत. या ३८ (४०.८६ टक्के) शेतमजुरांमधील वीस (५२.६३ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही प्रकारच्या वस्तू नाहीत. नऊ (२३.६८ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह, सात (१८.४२ टक्के) शेतमजुरांकडे

सायकल, सहा (१५·७९ टक्के) शेतमजुरांकडे कॉट, आहेत· तर प्रत्येकी दहा (२६·३२ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळे आहेत· तसेच स्वयंचलीत वाहने असणारा एक (२·६३ टक्के) शेतमजूर या गटातच आहे·

२·१ बी :

प्राथमिक शिक्षित गटातील ४४(४७·३१ टक्के) शेतमजुरांमधील बारा (२७·२७ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही वस्तू नाहीत· एकोणीस (४०·९१ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह आहे, तर तेवढ्याच शेतमजुरांकडे सायकली देखील आहेत· एका (२·२७ टक्के) शेतमजुराकडे शिवणयंत्र, दुस-याकडे टेबल-खुर्ची आहे· दोन (४·५४ टक्के) शेतमजुरांकडे वाद्ये आहेत· दहा - (२२·७३ टक्के) शेतमजुरांकडे कॉट आहे· तर वीस (४५·४५ टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत· असे वरील पाहणीवरून आढळून येते·

२·१ सी :

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण गटामध्ये असणा-या आकरा (११·८३ टक्के) शेतमजुरापैकी चार (३६·३६ टक्के) शेतमजुरांकडे वरीलपैकी कोणत्याही वस्तू नाहीत· तर एका शेतमजुरांकडे प्रत्येकी सायकल, कॉट व रेडिओ आहेत दोन (१८·१८ टक्के) शेतमजुरांकडे टेबलखुर्ची आहे तर सात (६३·६४ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह व तेवढ्याच शेतमजुरांकडे घड्याळे देखील आहेत· भूहीन शेतमजुराकडील वस्तुंचे विवेचन वरील शैक्षणिक गटानुसार पुढीलप्रमाणे मांडता येईल·

६·६·२ अे : अशिक्षित :

भूहीन सात (३१·८२ टक्के) शेतमजुरांमधील दोन (२८·५७ टक्के) शेतमजुरांकडे वरील कोणत्याही सुखसोयीच्या वस्तू नाहीत· प्रत्येकी एका (१४·२९ टक्के) शेतमजुराकडे स्टोव्ह, शिवणयंत्र, सायकल व कॉट या वस्तू

आहेत. तर दोन (२८.५७ टक्के) शेतमजुराकडे घड्याळे आहेत.

२ बी : प्राथमिक :

शिक्षण पातळी असणा-या पंधरा (६८.१८ टक्के) शेतमजुरांपैकी सात (४६.६७ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही वस्तू नाहीत. पाच - (३३.३३ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह, दोन (१३.३३ टक्के) शेतमजुरांकडे सायकली तर प्रत्येकी आठ (५३.३३ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळे आहेत.

६.२.३ :

खंडकरी शेतमजुरांकडे असणा-या वस्तूंचे पृथ्थकरण त्यांच्या - शैक्षणिक पातळीशी वरील गटानुसार पुढीलप्रमाणे करता येईल.

३ अे : अशिक्षित :

गटातील दोन (४० टक्के) शेतमजुरांपैकी एका (५० टक्के) शेतमजुराकडे रेडिओ आहे. तर दोन्ही (१०० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत.

३ बी :

प्राथमिक शिक्षित गटातील तीन (६० टक्के) शेतमजुरांमधील प्रत्येकी एका (३३.३३ टक्के) शेतमजुराकडे स्टोव्ह व कॉट आहे. दोन - (६६.६७ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ आहेत. तर तिन्ही (१०० टक्के) - शेतमजुरांकडे सायकली व घड्याळे आहेत.

६·३·० :

सर्व शेतमजुरांकडे असणाऱ्या वस्तूंचे स्पष्टीकरण जमीन क्षेत्राच्या आकारमानानुसार पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यासाठी त्यांच्या जमिनीचे - १) एक ते तीस आर· २) एकतीस ते साठ आर· ३) एकसष्ठ ते दोन हेक्टर पर्यंत असे तीन गट पाडून पुढीलप्रमाणे मांडता येईल·

६·३·१ :

अल्पभूधारक शेतमजरांकडील वस्तूंचे विवेचन त्यांच्या जमिनीचे वरीलप्रमाणे गट पाडून पुढीलप्रमाणे केले आहे·

३·१ अे :

एक ते तीस आर पर्यंत - जमीन असणाऱ्या ५१ (५४·८४ टक्के) शेतमजुरांमधील वीस (३९·२२ टक्के) शेतमजुरांकडे यापैकी कोणत्याही वस्तू नाहीत· तेवढयाच शेतमजुरांकडे स्टोव्ह व रेडिओ आहेत· तेरा (२५·४९ टक्के) शेतमजुरांकडे सायकल व कॉट आहेत· एकोणीस (३७·२५ टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत दोन (३·९२ टक्के) शेतमजुरांकडे टेबल खुर्ची आहे तर प्रत्येकी एका (१·९६ टक्के) शेतमजुरांकडे वाद्य व स्वयंचलीत वाहन आहे·

३·१ बी :

एकतीस ते साठ आर पर्यंत जमीन असणाऱ्या ३३ (३५·४८ टक्के) शेतमजुरांमधील आकरा (३३·३३ टक्के) शेतमजुरांकडे यातील काहीही नाही· तर तेवढयाच शेतमजुरांकडे स्टोव्ह आहेत· प्रत्येकी एका (३·०३ टक्के) - शेतमजुरांकडे शिवणयंत्र,टेबलखुर्ची व वाद्य आहे· बारा (३६·३६ टक्के) शेतमजुरांकडे सायकली आहेत· पाच (१५·१५ टक्के) शेतमजुरांकडे कॉट आहेत· दहा (३०·३० टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ आहेत तर चौदा (४१·४२ टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत·

३·१ सी :

६१ आर ते दोन हेक्टर पर्यंत जमीन गटातील नऊ (९·६८ टक्के) शेतमजुरांमधील पाच (५५·५६ टक्के) शेतमजुरांकडे यातील काहीही नाही· चार (४४·४४ टक्के) शेतमजुरांकडे सायकल व घड्याळे आहेत· प्रत्येकी तीन (३३·३३ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह व रेडिओ आहेत· तर दोन (२२·२२ टक्के) शेतमजुरांकडे कॉट आहेत असे दिसून येते·

६·३·२ :

खंडकरी शेतमजुरांकडे असणाऱ्या सुखसोयींच्या वस्तूंची माहिती त्यांच्या जमीन आकारमानाशी पुढीलप्रमाणे वरील जमीन गटानुसार स्पष्ट करता येते·

३·२ अे :

आकरा ते वीस आर जमीन गटातील एका (२० टक्के) - शेतमजुरांकडे सायकल, रेडिओ व घड्याळ यावस्तू आहेत·

३·२ बी :

एकतीस ते पन्नास आर या जमीन गटातील दोन (४० टक्के) शेतमजुरांमधील दोन्ही (१०० टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व घड्याळे आहेत· तर प्रत्येकी एका (५० टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह, सायकल व कॉट यासारख्या वस्तू आहेत·

३·२ सी :

८१ आर ते दोन हेक्टर या जमीन गटातील दोन (४० टक्के) - शेतमजुरांमधील दोन्ही (१०० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत· तर एका (५० टक्के) शेतमजुरांकडे सायकल आहे·

६·४·० :

सर्व शेतमजुरांकडे असणा-या सुखासोयींच्या वस्तूंचे पृथःकरण त्यांच्या कुटुंबाच्या आकारमानाशी १) एक ते दोन व तीन व्यक्ती २) चार व पाच व्यक्ती ३) सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती· या तीन गटामध्ये पुढीलप्रमाणे मांडता येईल·

६·४·१ :

अल्पभूधारक शेतमजुरांकडे असणा-या वस्तूंचे पृथःकरण त्यांच्या कुटुंबाच्या आकारमानाच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे मांडता येईल·

४·१ अे :

एक ते दोन व तीन व्यक्तीइतके कुटुंबाचे आकारमान असणा-या एकोणीस (२०·४३ टक्के) अल्पभूधारक शेतमजुरांमधील बारा (६३·१६ टक्के) शेतमजुरांकडे यामधील कोणत्याही वस्तू नाहीत· सहा (३१·५८ टक्के) - शेतमजुरांकडे प्रत्येकी स्टोव्ह व घड्याळे आहेत· प्रत्येकी दोन (१०·५३ टक्के) शेतमजुरांकडे कॉट व टेबलखुर्ची आहे· तर सायकल व रेडिओ असणा-या - शेतमजुरांचे प्रमाण अनुक्रमे तीन (१५·७९टक्के) व चार (२१·०५ टक्के) इतके आहे·

४·१ बी :

चार व पाच व्यक्ती असे कुटुंबाचे आकारमान असणा-या ५५(५९·१४-टक्के) अल्पभूधारक शेतमजुरांमधील आठरा (३२·७३ टक्के) शेतमजुरांकडे वरीलपैकी कोणत्याही वस्तू नाहीत· प्रत्येकी एका (१·८२ टक्के) शेतमजुरांकडे शिवणयंत्र,टेबलखुर्ची,व स्वयंचलीत वाहन आहे· दोन (३·६४ टक्के) -

...१६३/-

शेतमजुरांकडे वाद्ये आहेत. एकोणीस (३४.५४ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह, सोळा (२९.०९ टक्के) शेतमजुरांकडे सायकली, बारा (२१.८२ टक्के) - शेतमजुरांकडे कॉट, तेवीस (४१.८२ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ तर बावीस (४० टक्के) शेतमजुरांकडे घडयाळे आहेत.

४.१ सी :

सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती असे कुटुंबाचे आकारमान असणाऱ्या एकोणीस (२०.४३ टक्के) शेतमजुरांमधील सहा (३१.५८ टक्के) शेतमजुरांकडे वरील कोणत्याही वस्तू नाहीत तर प्रत्येकी तेवढयाच शेतमजुरांकडे कॉट व रेडिओ आहेत. प्रत्येकी नउ (४७.३७ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह व घडयाळे आहेत. तर दहा (५२.६३ टक्के) शेतमजुराकडे सायकली असल्याचे या पहाणीवरुन आढळून येते.

६.४.२ :

भूहीन शेतमजुरांच्याकडे असणाऱ्या सुखासोईच्या वस्तूंचे विवेचन त्यांच्या कुटुंबाच्या आकारमानाच्या प्रमाणाशी पुढीलप्रमाणे मांडता येते.

४.२ अे :

तीन व्यक्ती कुटुंबाचे आकारमान असणाऱ्या दोन (९.०९ टक्के) शेतमजुरांपैकी एक (५० टक्के) शेतमजुराकडे यातील कोणतीही वस्तू नाही तर फक्त दुसऱ्या शेतमजुराकडे फक्त एक शिवणयंत्र आहे.

४.२ बी :

चार व पाच व्यक्ती असे कुटुंबाचे आकारमान असणाऱ्या चौदा (६३.६४ टक्के) भूहीन शेतमजुरांपैकी सहा (४२.८६ टक्के) शेतमजुरांकडे

या मधील कोणतीही वस्तू नाही. तीन (२१.४३ टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह, दोन (१४.२९ टक्के) शेतमजुरांकडे सायकल, सहा (४२.८६ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ तर सात (५० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे.

<u>४.२ सी :</u>

सहा व सहापेक्षा जास्त व्यक्ती कुटुंबामध्ये असणा-या सहा (२७.२७ टक्के) भूहीन शेतमजुरांपैकी दोन (३३.३३ टक्के) शेतमजुरांकडे कोणत्याही वस्तू नाहीत. प्रत्येकी एका (१६.६७ टक्के) शेतमजुरांकडे सायकल व कॉट आहे. दोन (३३.३३ टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ तर तीन (५० टक्के) शेतमजुरांकडे स्टोव्ह व घड्याळे आहेत.

<u>६.४.३ अे :</u>

चार व पाच व्यक्तींचे कुटुंब असणा-या सर्व खंडकरी शेतमजुरांपैकी प्रत्येकी एका (२० टक्के) शेतमजुराकडे स्टोव्ह व कॉट आहे. तसेच प्रत्येकी तीन (६० टक्के) शेतमजुरांकडे रेडिओ व सायकली आहेत. तर पाचही (१०० टक्के) शेतमजुरांकडे घड्याळे आहेत.

या प्रकरणात चर्चा करण्यासाठी घेतलेल्या पैकी वस्तू नसलेले एकूण ४५ (३७.५ टक्के) शेतमजूर आहेत. या शेतमजुरांच्यापैकी एकतीस - (२५.८३ टक्के) जणांच्या घरात स्टोव्ह आहेत. पस्तीस (२९.१७ टक्के) शेतमजुरांकडे सायकली आहेत. ४४ (३६.६७ टक्के) घरात रेडिओ व ५२ (४३.३३ टक्के) जणांकडे घड्याळे आहेत बावीस (१८.३३ टक्के) घरात कॉट आहेत. शिवणयंत्रे, टेबल-खुर्ची, वाद्ये, व स्वयंचलीत वाहने, - शेतमजुरांकडे अभावानेच आढळतात.